महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १९ वे दिनांक : ०७/०१/२०२६ वार : बुधवार

## भाजपचा शिंदे गटाला धक्का, नगरपरिषदेत काँग्रेससोबत हात मिळवणी करत सत्ता स्थापन



**मुंबई** : ठाणे जिल्ह्याच्या जिल्ह्याच्या राजकारण मोठी उलथापालथ पाहायला मिळाली आहे. अंबरनाथ नगरपरिषदेच्या सत्तेच्या समीकरणात मोठी उलथापालथ झाली असून सत्तेसाठी भारतीय जनता पक्षाने शिंदेसेनेला बाजूला ठेवून चक्क काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्याशी हातमिळवणी केली आहे. या नव्या युतीमुळे शिवसेना शिंदे गट २३ जागांवर विजय मिळवून देखील सत्तेपासून दूर फेकली गेली आहे.

अंबरनाथ नगरपरिषदेच्या एकूण 59 जागांपैकी बहुमतासाठी 30 जागांची आवश्यकता होती. निवडणुकीत भाजपच्या तेजश्री करंजुले नगराध्यक्षपदी निवडून आल्या असल्या, तरी भाजपला बहुमत मिळाले नव्हते. सत्तेचा आकडा गाठण्यासाठी भाजपने स्वत:चे १६, काँग्रेसचे १२ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ४ अशा एकूण ३२ नगरसेवकांची मोट बांधत अंबरनाथ नगर परिषदेत सत्ता स्थापन केली आहे. या अजब समीकरणामुळे 'काँग्रेसमुक्त भारत'चा नारा देणाऱ्या भाजपने अंबरनाथमध्ये मात्र सत्तेसाठी काँग्रेसची साथ घेतल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

भाजप आणि काँग्रेस एकत्र आल्याने शिवसेना शिंदे गट कमालीचा संतप्त झाला आहे. अंबरनाथचे आमदार बालाजी किणीकर यांनी या युतीवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. "एकीकडे काँग्रेसमुक्त भारताच्या घोषणा द्यायच्या आणि दुसरीकडे सत्तेसाठी काँग्रेससोबत हातमिळवणी करायची, ही शुद्ध फसवणूक आहे. भाजपने शिवसेनेचा घात केला असून ही युती अत्यंत अभद्र आहे," अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

शिवसेनेच्या टीकेला भाजपचे उपाध्यक्ष गुलाबराव करंजुले पाटील यांनी तितक्याच धारदार शब्दांत उत्तर दिले आहे. "गेल्या 25 वर्षांपासून अंबरनाथमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्या शिंदे गटासोबत सत्तेत बसलो असतो, तर ती खऱ्या अर्थाने अभद्र युती ठरली असती. आम्ही महायुतीसंदर्भात अनेकदा बोलणी करण्याचा प्रयत्न केला, पण शिंदे गटाच्या नेत्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही," असा पलटवार करंजुले पाटील यांनी केला.

अंबरनाथची ही निवडणूक भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेची मानली जात होती. भाजपच्या तेजश्री करंजुले यांनी शिंदे गटाच्या मनिषा वाळेकर यांचा पराभव करत नगराध्यक्षपद पटकावले. या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष भाजपाचा झाला असला तरी देखील याठिकाणी सर्वाधिक नगरसेवकपदाचे उमेदवार शिवसेनेचे विजयी झाले आहेत. त्यामुळे नगराध्यक्षपद असूनही भाजपकडे बहुमत नव्हते. आता भाजप आणि काँग्रेसच्या युतीमुळे शिवसेना शिंदे गटाला सर्वाधिक 23 जागा जिंकूनही विरोधी बाकावर बसावे लागणार आहे.

राज्यातील महायुतीमध्ये 'ऑल इज वेल' असल्याचा दावा नेत्यांकडून केला जात असला तरी, अंबरनाथच्या या प्रकारामुळे स्थानिक पातळीवर भाजप आणि शिवसेना शिंदे गटामधील दरी प्रचंड वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

## नाशिकमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीला खिंडार



**नाशिक** : राज्यात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे बिगुल वाजल्याने राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला असून सर्वच प्रमुख पक्षांचे दिग्गज नेते प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. अशा धामधुमीत नाशिकमध्ये शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला असून पक्षाच्या एका बड्या नेत्याने शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या पक्षांतरामुळे नाशिकमध्ये शिवसेनेची ताकद वाढली असून, दुसरीकडे दिग्गज नेत्याच्या एक्झिटमुळे राष्ट्रवादीच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे.

नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर शहरात मोठी राजकीय उलथापालथ झाली असून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष नितीन भोसले यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत झालेल्या या महत्त्वपूर्ण बदलामुळे नाशिकचे राजकीय वातावरण पूर्णपणे ढवळून निघाले असून, या पक्षप्रवेशाचा मोठा परिणाम आगामी महापालिका निवडणुकीच्या निकालावर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शरद पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष नितीन भोसले यांच्यासह त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांनीही आज शिवसेनेत प्रवेश केला आहे. यात महाराष्ट्र ट्रायथलॉन असोसिएशनचे सचिव राजेंद्र लिंबाळते, नाशिक ॲडव्हर्टायझिंग असोसिएशनचे प्रशांत ठाकरे, युवराज भोसले, सचिन सोनवणे, प्रसाद आंबेकर, अनुप भोसले, पृथ्वीश भोसले यांचा समावेश आहे. यामुळे आगामी निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढली आहे.

नितीन भोसले यांच्यासह माजी महापौर अशोक मुर्तडक आणि माजी महापौर दशरथ पाटील यांनी आज एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. ठाण्यातील 'शुभ दीप' या निवासस्थानी हा सोहळा पार पडला. अशोक मुर्तडक आणि दशरथ पाटील हे दोघेही काही काळापूर्वी भाजपमध्ये सक्रिय झाले होते. मात्र आगामी निवडणुकीसाठी उमेदवारी डावलली गेल्याने नाराज होऊन मुर्तडक यांनी शिवसेनेची वाट धरली आहे. या दिग्गज नेत्यांच्या पक्षप्रवेशामुळे नाशिकमध्ये शिवसेनेची ताकद वाढली असून विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## विलासराव हयात नसताना टीका करणे चुकीचे - असदुद्दीन ओवेसी

**लातूर** : भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी लातूरच्या सभेत बोलत असताना माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुखांच्या विषयी वादग्रस्त विधान केले होते. यावरून विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली असून त्यांनी दिलगिरी देखील व्यक्त केली आहे. आता यावर एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे.

विलासराव देशमुखांनी काही चांगले कामे कली, काही चुकीची कामे कली. पण ते हयात नसताना त्यांच्यावर टीका करणे योग्य नाही, असे असदुद्दीन ओवेसी यांनी म्हटले आहे. तसेच मी फक्त मोठ्या बापाचा मुलगा आहे असे सांगून राजकारण करता येत नाही. लातूरसाठी तुम्ही काय केले याचा हिशोब द्या, असे म्हणत ओवेसी यांनी कॉंग्रेसचे आमदार अमित देशमुख यांच्यावर देखील निशाणा साधला.

घराणेशाहीवर बोलताना असदुद्दीन ओवेसी म्हणाले, मी मोठ्या बापाचा मुलगा आहे, वडील आमदार होते, असे सांगून राजकारण करता येत नाही. लोकप्रतिनिधी म्हणून काय कामे केलीत, ते जनतेसमोर ठेवा. मोठमोठ्या राजांचे महाल ओसाड पडले आहेत, मग वारसा सांगत बसण्यात अर्थ नाही. तसेच लातूरमधील नागरी समस्या अनेक वर्षांपासून जैसे थे असल्याचा आरोप ओवेसी यांनी केला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसला मत म्हणजे भाजपाला मत, अजित पवार काकाचा होऊ शकले नाहीत मग लातूरचे कसे होणार? अशा शब्दात ओवैसींनी अजित पवारांवरही टीका केली.

केंद्र सरकारवर टीका करताना असदुद्दीन ओवेसी म्हणाले, पंतप्रधान हा संपूर्ण देशाचा पंतप्रधान असतो. ट्रम्प विमानात उभे राहून मोदींबद्दल वक्तव्य करतात आणि २४ तास उलटूनही कोणी उत्तर देत नाही. ट्रम्पचे नाव घेतले की तुम्ही का थंड होता? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ७ जानेवारी २०२६


## श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कदेर येथे उद्घाटन



**उमरगा (नागसेन कांबळे) :** तालुक्यातील कदेर या गावी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन उमरगा तालुक्यातील कदेर या गावी करण्यात आले आहे.यावर्षी "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन शाश्वत विकासासाठी युवक"साठी दिनांक ०६/०१/२०२६रोजी राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे उद्घाटन श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे ,संचालक डॉ,सागर पतंगे आणि श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे समन्वयक श्री.गोरख घोडके यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड , संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर तात्या हिरवे ,लोकमान्य टिळक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री मुरलीधर जाधव,सचिव श्री धनराज जाधव श्री अभयकुमार हिरास,रत्नाकर तात्या पतंगे,श्री सचिन लोखंडे, तंटा मुक्तीचे अध्यक्ष श्री.साखरे,कदेर गावचे सरपंच श्री सतीश जाधव,उपसरपंच सौ. राणी राठोड, प्रा.डॉ.बालाजी कोनाळे ,ग्रामविकास अधिकारी श्री. एम. एम. बिराजदार श्री. बाळासाहेब गायकवाड(मुख्याध्यापक,लोक मान्य टिळक माध्यमिक विद्यालय, कदेर) हेही उपस्थित होते. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस अभिवादन व उपस्थितांचा सत्कार करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.आपल्या उद्घाटकीय संभाषणात श्री गोरख घोडके यांनी आजच्या युवकासमोरील आव्हाने त्याचा सामना आधुनिक युगात कसा करावा लागेल याचे अत्यंत प्रदीर्घ विवेचन केले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या आखून दिलेल्या उद्दिष्टांबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी हे व्यासपीठ अत्यंत सुवर्णसंधी आहे."पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन शाश्वत विकासासाठी युवक" नेतृत्व व जाणीव जागृती शिबिराच्या माध्यमातून ही संकल्पना समाजात आणि युवकात रुजवून समाजाप्रती बांधिलकी निर्माण करणे हेच या शिबिराचा उद्देश आहे.एवढेच नव्हे तर अशा चळवळ व उपक्रमातून विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्धः करावे. राष्ट्रनिर्मिती व राष्ट्रउभारणीसाठी युवकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. युवकांची भूमिका हेच देशाचे भवितव्य असते त्यामुळे युवकांनी झोकून देऊन , समर्पणाच्या भावनेने या राष्ट्रीय योजनेत काम केले पाहिजे. स्वतः बहरून आले पाहिजे, व्यावहारिक ज्ञान संपादन केले पाहिजे . अनुभव आणि अनुभूतीतून निरीक्षण केले की आपोआप जिज्ञासा निर्माण होते जिज्ञाशेतून शाश्वती आणि जाणीव जागृती होऊन माणूस समृद्ध बनतो असे विद्यार्थ्यांना चौफेर मार्गदर्शन केले आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर गुलाब राठोड यांनी अत्यंत सविस्तरपणे राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश आणि उद्दिष्टे सर्वांसमोर ठेवली कदेर हेच गाव का निवडले याबद्दल ही माहिती दिली विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर व गुणवत्तेबरोबर चारित्र्यही सांभाळले पाहिजे त्यामुळे यापुढील सहा दिवस राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांचे वर्तन अतिशय स्वच्छ व प्रामाणिक असले पाहिजे याविषयी कठोरपणे विद्यार्थ्यांनी शिस्त पाळण्याचे आवाहन केले. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या मनिषा जाधव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला प्रतिनिधी प्रा. डॉ. मल्लमा आंबुसे यांनी केले. तर आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. भाऊसाहेब उगले यांनी केले.यावेळी ग्रामस्थ ,शिबिरार्थी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## विषयतज्ज्ञांकडून इकरा पब्लिक शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षाविषयक मार्गदर्शन



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूलने अलीकडेच आपल्या १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी विषयावर आधारित एका मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले. मराठी विषयातील तज्ञ असलेले शेख हिमायू सर यांनी या सत्राचे नेतृत्व केले आणि त्यांनी विषयाशी संबंधित शंका व कृतीपत्रिकांशी संबंधित प्रश्नांचे निरसन केले.हे सत्र शाळेच्या मार्गदर्शन मालिकेचा एक भाग होते,ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात मदत करणे हा आहे. हिमायू सरांच्या तज्ञतेमुळे विद्यार्थ्यांना मराठी अभ्यासक्रम अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत झाली,ज्यामुळे ते परीक्षेसाठी तयार झाले.हे सत्र शाळेच्या मार्गदर्शन मालिकेचा भाग होता.हिमायू सर यांनी गुंतागुंतीचे विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगितले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना समजणे सोपे झाले,आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना सर्वोत्तम संभाव्य संसाधने आणि समर्थन प्रदान करण्यात विश्वास ठेवतो. यासारखी सत्रे आमच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या उत्कृष्ट होण्यास मदत करतात," असे शाळा प्रशासनाने सांगितले

## प्रा डॉ स्मिता अवचार यांना पितृशोक



**छत्रपती संभाजीनगर :** श्री. शरद विष्णू देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी. रा ज्योतीनगर यांचे वृद्धाप-काळामुळे काल सायंकाळी ३.४५ निधन झाले आहे मृत्युसमयी त्यांचे वय ९५ होते ते सुहास देशपांडे, प्रा. डॉ. स्मिता सुरेश अवचार, डॉ. सुशिल देशपांडे यांचे व व वडील होत तथा डॉ. संगिता सुशिल देशपांडे.तथा सुरेश अवचार यांचे सासरे होते काल सायंकाळी प्रतापनगर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


## पत्रकारांनी जनतेच्या प्रश्नांशी निगडीत लेखन करावे - प्रा. डॉ. शिवाजी हुसे



**कन्नड/ प्रतिनिधी :** सध्याच्या सोशल मीडियाच्या वातावरणामुळे प्रिंट मिडियाला कठीण परिस्थितीतून जावे लागत आहे. कुठे जरा काही झाले की, सोशल मीडियावर त्या घटनेची त्रोटक माहिती दिली जाते. मात्र प्रिंट मिडियात सविस्तर माहिती दिली जात असल्याने आजही प्रिंट मिडियावरच मिळत असल्याने जनतेच्या विश्वासाला प्रिंट मिडिया पात्र असून पत्रकारांनी जनतेच्या प्रश्नांशी निगडीत लेखन करावे, असे प्रतिपादन तिफनकार प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांनी केले आहे. कन्नड शहरातील सहकारमहर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयात दर्पण दिनानिमित्त कन्नड तालुका पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी सर्व पत्रकार बांधवांनी आद्य पत्रकार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर आणि कन्नड तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष स्व. सुरेश केवट यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी वरिष्ठ पत्रकार राजानंद सुरडकर, मुक्त पत्रकार तथा सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक संजय जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.त्यात कार्याध्यक्ष - राजानंद सुरडकर, अध्यक्ष - विठ्ठल शिरसे, उपाध्यक्ष -अनिल शिरसाठ, आर. एस. पवार, सचिव - शेख इलियास, सहसचिव शेख आकिब, कोशाध्यक्ष - मुजीब खान, सदस्य - अनिल गायकवाड, राजेंद्र नेवगे, अभिषेक देशमुख, किशोर क्षिरसागर, विशाल भालेराव, संतोष खाजेकर, सल्लागार - प्रा.डॉ. शिवाजी हुसे, संजय जाधव, संजय केवट आणि रविंद्र अजमेरा आदींचा समावेश आहे. संजय केवट यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ७ जानेवारी २०२६


## डॉ. मृदुला कुमावत यांना पीएच.डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** जिद्द, चिकाटी आणि आपल्या मातीशी असलेले घट्ट नाते यांच्या जोरावर डॉ. मृदुला पांडुरंग कुमावत यांनी वैद्यकीय संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या पदवीदान समारंभात मृदुला कुमावत यांना 'कर्करोग निदान' (Cancer Diagnosis) या अत्यंत महत्त्वाच्या विषयावरील संशोधनासाठी पीएचडी (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली.शैक्षणिक प्रवास आणि संशोधनडॉ. मृदुला यांचे प्राथमिक व उच्च शिक्षण मुंबईत झाले. त्यांनी मुंबई विद्यापीठातून बी. फार्मसी आणि एम. फार्मसीचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले होते. त्यानंतर त्यांनी कर्करोग निदानासारख्या कठीण विषयावर संशोधनाचा निर्णय घेतला. या संशोधनासाठी त्यांना डॉ. हेमंत उणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली मृदुला यांनी आपला शोधप्रबंध यशस्वीरीत्या पूर्ण केला. मायभूमीशी जपले नातेविशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, डॉ. मृदुला कुमावत या सध्या दक्षिण आफ्रिका (South Africa) येथे स्थायिक आहेत. परदेशात वास्तव्यास असताना आणि तिथल्या व्यस्त जीवनशैलीतही त्यांनी भारतीय विद्यापीठातून आपले संशोधन पूर्ण करण्याला प्राधान्य दिले. त्यांच्या या यशामुळे 'सातासमुद्रापार राहूनही मायभूमीशी असलेले नाते अखंड असते', हेच त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.कुटुंबीयांकडून कौतुकाचा वर्षावमृदुला यांच्या या यशात त्यांच्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे. त्यांच्या या यशाबद्दल: पांडुरंग कुमावत व निर्मला कुमावत (आई-वडील) श्रीमती सरला कामे-कुमावत श्री. अशोक कुमावत ( काका-काकू) अजिंक्य कुमावत, श्रद्धा कुमावत आणि शुभम कुमावतयांच्यासह मित्रपरिवाराने त्यांचे भरभरून कौतुक केले आहे.सर्वत्र अभिनंदन कर्करोगासारख्या गंभीर आजाराच्या निदानावर त्यांनी केलेले संशोधन भविष्यात वैद्यकीय क्षेत्रासाठी उपयुक्त ठरणार आहे. एका मराठी कन्येने परदेशात राहून मिळवलेल्या या शैक्षणिक यशामुळे सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## माधवराव पाटील महाविद्यालयात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती उत्साहात साजरी




**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती मंगळवारी (ता.६) रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र पत्रकार संघ, धाराशिव व मुरूम शहर पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित माधवराव पाटील महाविद्यालयात डॉ. रामलिंग पुराणे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय समारोप प्रसंगी उपप्राचार्य चंद्रकांत बिराजदार यांनी पत्रकार दिनाचे महत्त्व प्रतिपादन करताना पत्रकार हा लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. त्यांच्या लेखणीतून समाज प्रबोधन करून देशहित, राष्ट्रप्रेम जपले पाहिजे. अन्यायाला वाचा फोडण्याचे काम पत्रकारांची लेखणी करते. असा मौलिक संदेश त्यांनी यावेळी दिला. यावेळी महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष डॉ. सुधीर पंचगल्ले, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सादक वली, रोटरीचे अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, राजेंद्र कारभारी, जमीर शिकलकर, राजेंद्र घोडके, महेश निंबरगे, अमोल गायकवाड, अजिंक्य मुरूमकर, जगदीश सुरवसे, बालाजी व्हनाजे, नाहीरपाशा मासूलदार, हुसेन नुरसे, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. शिला स्वामी, प्रा. वैष्णवी पाटील, डॉ. रवींद्र गायकवाड, डॉ. प्रतापसिंग राजपूत आदींची प्रमुख उपस्थिती होती. योगेश पांचाळ, किशोर कारभारी, दत्तू गडवे आदींनी पुढाकार घेतला. प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुजित मटकरी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. अजिंक्य राठोड यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## संविधानाच्या किमयेने

संविधानाच्या छायेत,आम्ही सुरक्षित झालो.
संविधानाच्या किमयेने,आता माणसात आलो.

अरे मनुवादाने छळून आम्हा,खूप ताणले.
भिमरायांनी संविधान लिहून,माणसात आणले.

शिक्षणाचा अधिकार देऊन ,वाचा फोडली.
बहुजनांच्या गुलामगिरीची,सारी बंधने तोडली.

संविधानाचे उपकार आम्ही,विसरणार नाही.
मानवतेने माणुसकीला,कायम जोडत राही.

भारतीयांनो संविधान वाचून,आता सुरक्षित राहू.
एकमेकांना मदत करून,जगताना आनंदात पाहू.

संविधानाच्या छायेत आम्ही,सुरक्षित झालो.
वाघिणीचे दूध पिऊनी, माणसात आलो.

संविधान आपले दैवत आहे,मनात जपून ठेवूया.
वादविवाद टाळून सदैव,चला मदतीस जावूया.

संविधान दूत बनून,सदा सर्वदा जागृत राहूया.
संविधानाचे विचार,चला जना- मनात पेरूया.

**✍ नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक,
आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ७ जानेवारी २०२६


## राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास प्रारंभ




**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील भारत शिक्षण संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मुरूम अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे उद्घाटन भारत शिक्षण संस्थेचे संचालक श्री त्र्यंबकराव इंगोले यांच्या हस्ते बिरुदेव माळ गणेश नगर येथे करण्यात आले यावेळी भारत शिक्षण संस्था संचालक तानाजी फुगटे माजी प्राचार्य दिलीप इंगोले, सरपंच उषाताई चव्हाण, उपसरपंच सतीश पवार, बाला राठोड, ओम चव्हाण पोलीस पाटील श्रीमती कलावती चव्हाण यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. विशेष शिबाराला संबोधित करताना महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डी. टी. इंगोले यांनी समाजसेवेसाठी स्वयंसेवकांमध्ये भावना रुजवणे ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडवणे हा राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य हेतू आहे असे मत व्यक्त केले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले यांनी स्वयंसेवक यांना संबोधित करताना विशेष शिबिरामध्ये जनजागृती ग्राम स्वच्छता,आरोग्य शिबिर, अंतर्गत रस्ते, महिला मेळावा असे विविध उपक्रम घेण्यात येणार असून त्यातून स्वयं सेवका मध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होण्यासाठी मदत होईल व या शिबिराच्या माध्यमातून नेतृत्व गुण, संघ भावना व सामाजिक बांधिलकी निर्माण होईल असे मत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.प्रसाद इंगोले प्रा शेषेराव राठोड , प्रा वर्षा हुलगुंडे, प्रा प्रकाश चव्हाण प्रा सुजित चिकुंद्रे प्रा भगवंत चोगुले प्रा किशोर कांबळे प्रा इंद्रजीत चौधरी प्रा श्रीकांत शिंदे प्रा विनय इंगळे प्रा रोहन हराळकर अवधूत गुरव, अनिकेत सगट,व स्वयंसेवक उपस्थित होते प्रा. के बी. माने यांनी सूत्रसंचालन व कार्यक्रमाधिकारी गजानन उपासे यांनी आभार मानले.

## बिनविरोध निवड झाल्यास 'नोटा'चे काय? - प्रा. शिवाजी वाठोरे

महाराष्ट्रात २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीची धामधूम आणि महानगरात प्रचारास वेग आलेला असतानाच भारतीय जनता पक्षाचे जवळपास ६८ महापालिका सदस्य बिनविरोध निवडून आल्याचे समजते. मुंबईमध्ये एकेका उमेदवारास उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी प्रत्येकी पाच कोटी रुपये दिले गेल्याचा एका उमेदवाराने आरोप करून या बाबत चौकशी करण्याची मागणी केली आहे. कार्यकर्त्यांच्या, नेत्यांच्या पातळीवर असे सर्रास 'अर्थ' पूर्ण व्यवहार होत असतील तर मतदारांचे काय काम? मग निवडणुकांचा आणि मतदारांचा काही संबंध आहे की नाही, निवडणुकांचा फार्स कशासाठी करायचा? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. पश्चिम बंगालमध्ये बिनविरोध निवडून आलेल्या महापालिका सदस्यांच्या विरोधात भाजपाने न्यायालयात धाव घेतली तर महाराष्ट्रातही काही नेते न्यायालयात दाद मागणार असल्याची वदंता आहे. या संबंधी या पूर्वीच मा. सर्वोच्च न्यायालयाने बिनविरोध निवडणुकांबंधी चांगलेच खडसावत ताशेरे ओढले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने या संबंधी नोंदविलेले निरीक्षण असे: १. बिनविरोध निवडणूक म्हणजे मतदार राजाचा मतदानाचा अधिकार हिरावून घेणे होय. अशा बिनविरोध निवडणुकांमुळे मतदाराना त्यांचा मतदानाचा घटनात्मक अधिकार वापरता येत नाही. २. मतदान करताना 'नोटा' म्हणजे वरीलपैकी कोणीही नाही हा पर्याय असतो. कायद्याच्या कलम १९ प्रमाणे हा मतदाराच्या अभिव्यक्तीचा भाग आहे. बिनविरोध निवडणुकांमुळे मतदाराचा हा अधिकार हिरावल्या जातो.३.सत्तेचा दबाव असल्याने अनेक गैरप्रकार होण्याची शक्यता असते.४. उत्तरदायित्वाचा अभाव म्हणजे निवडून आलेल्या उमेदवारास एकप्रकारचा अहंगंड निर्माण होऊ शकतो. मला कोणीही मतदान केलेले नाही, त्या मुळे मी कोणाचेही काही देणे लागत नाही. माझ्याकडे कोणी कोणतेही काम घेऊन येऊ नये. अशा रीतीने त्याचे कामाप्रती उत्तरदायित्व कमकुवत होऊ शकते.५. कोणीही मतदान प्रक्रियेशिवाय निवडून येणे लोकशाहीसाठी घातक आहे.६. एखाद्या उमेदवारास प्रतिस्पर्धी नसेल, निवडणुकीसाठी एकमेव उमेदवार असेल तरीही तो उमेदवार आणि नोटा म्हणजे यापैकी कोणीही नाही असे दोन पर्याय ठेवून त्या उमेदवारास किमान दहा ते पंधरा टक्के मते मिळायला हवीत, तरच त्यास विजयी घोषित करावे. अशी काही निरीक्षणे मा. सर्वोच्च न्यायालयाने नोंदविली आहेत. त्या बरहुकुम निवडणूक आयोगाने आता ज्या ज्या ठिकाणी उमेदवार बिनविरोध निवडून आलेले आहेत, त्या त्या ठिकाणच्या निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविले आहेत. याचा अर्थ असा की, आता तेथे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतील. म्हणजे हुकुमशाहीकडे वाटचाल करणाऱ्या सत्ताधाऱ्यास ही एक फार मोठी चपराक आहे, असे म्हणवयास हरकत नसावी. 'नोटा' हे मतदारांच्या हातात असलेले फार मोठे हत्यार आहे, जे मस्तवाल राजकारणी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात वापरण्याची संधी आहे, तिचे सोने केले पाहिजे. समृद्ध लोकशाहीसाठी ते गरजेचे आहे.(लेखक ख्यातकीर्त कवी, समीक्षक व सामाजिक चळवळीचे अभ्यासक आहेत.)

## ठाकरे गटाच्या उमेदवाराच्या आईचा आत्महत्येचा प्रयत्न

**सांगली :** राज्यातील 29 शहरांमध्ये मिनी विधानसभा मानल्या जाणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीचा धुरळा उडालेला असतानाच, सांगलीत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या एका उमेदवाराला उमेदवारी मागे घेण्यासाठी धमकावण्यात आल्याचा आरोप होत आहे. या सततच्या दबावाला कंटाळून संबंधित उमेदवाराच्या आईने विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर सांगलीच्या राजकीय वातावरणात प्रचंड तणाव निर्माण झाला आहे.

सांगलीतील प्रभाग क्रमांक 16 मध्ये शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार निवडणूक लढवत आहेत. सोमवारी या उमेदवाराच्या आईने विष प्राशन केले. त्यांना तातडीने सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडीकडून या उमेदवारावर उमेदवारी मागे घेण्यासाठी प्रचंड दबाव टाकला जात होता. या त्रासाला कंटाळूनच त्यांच्या आईने हे टोकाचे पाऊल उचलले, असा दावा ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे.

या घटनेचे वृत्त समजताच दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी सांगलीच्या शासकीय रुग्णालयाबाहेर मोठी गर्दी केली होती. यावेळी दोन्ही गटांमध्ये जोरदार वादावादी आणि घोषणाबाजी झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी वेळीच मध्यस्थी केल्याने पुढील अनर्थ टळला. सध्या रुग्णालयाबाहेर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या घटनेनंतर शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या उषाताई जाधव यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. "आमच्या उमेदवाराला प्रचारापासून रोखले जात आहे. त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर प्रचंड दबाव असून मोठी दहशत निर्माण केली जात आहे. माझ्याकडे या दडपशाहीचे ऑडिओ कॉल रेकॉर्डिंग्स देखील उपलब्ध आहेत. जर हिंमत असेल तर समोरासमोर लढा, अशी भेकडासारखी दमदाटी करू नका," अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना इशारा दिला. तसेच, सोलापूरप्रमाणेच सांगलीची जनताही या दडपशाहीला उत्तर देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दुसरीकडे, काँग्रेसचे उमेदवार राजेश नाईक यांनी ठाकरे गटाने केलेले सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. "वार्ड 16 मध्ये आमचा प्रचार शांततेत सुरू आहे. आम्ही कुणावरही दबाव टाकलेला नाही. हा सर्व प्रकार घरगुती वादातून घडला असावा, परंतु विरोधक त्याचे राजकीय भांडवल करत आहेत. संबंधित महिला आमचीही कार्यकर्ती म्हणून काम करत होती," असे म्हणत नाईक यांनी आपली बाजू मांडली.

महानगरपालिका निवडणूक ही स्थानिक वर्चस्वाची लढाई मानली जाते, मात्र सांगलीतील या घटनेने निवडणुकीच्या प्रचाराचा स्तर घसरल्याची चर्चा सामान्य नागरिकांमध्ये सुरू आहे. या घटनेमुळे सांगलीतील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. एका बाजूला विकासाचे दावे केले जात असताना, दुसरीकडे उमेदवारांच्या कुटुंबीयांना आत्महत्येसारखे पाऊल उचलावे लागत असेल, तर ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त केले जात आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ७ जानेवारी २०२६


## प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने पत्रकार बांधवांचा सत्कार



**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिनाचे औचित्य साधून मंगळवारी (ता. 6) रोजी मुरुम येथील प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयात पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुरुम शहर व परिसरातील सर्व पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य उल्हास घुरघुरे होते. यावेळी मुरुम शहर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे, महाराष्ट्र पत्रकार संघटनेचे मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, पत्रकार राजेंद्र कारभारी, ज्येष्ठ पत्रकार प्रा. डॉ. महेश मोटे आदींचे प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात मान्यवरांनी पत्रकारितेचे सामाजिक दायित्व, जबाबदारी आणि बदलत्या काळातील आव्हाने यावर विचार मांडले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रा. डॉ. महेश मोटे यांनी अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. पत्रकारिता ही केवळ बातमी देण्याचे माध्यम नसून समाजाला दिशा देणारी शक्ती आहे. सत्य, निर्भीडता आणि सामाजिक भान जपत पत्रकारांनी कार्य केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. डिजिटल युगात अफवांपासून दूर राहून तथ्याधारित पत्रकारितेची गरज अधिक वाढली असल्याचेही त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य उल्हास घुरघुरे यांनी केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व पत्रकार बांधवांचा लेखणी व डायरी देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार प्रा. अमोल गायकवाड यांनी केले. यावेळी प्रा. बिभीषण बंडगर, प्रा. राघवेंद्र धर्माधिकारी, प्रा. नारायण सोलंकर, प्रा.अभिजीत अंबर आदींनी पुढाकार घेतला. सूत्रसंचालन प्रा. संजय गिरी तर आभार पत्रकार प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले यांनी मानले.

## साक्षर भारत घडवूया

शिक्षणाची गंगा
आली आपल्या दारी
चला सर्व शाळेला
राहू नका घरी

अज्ञानाच्या अंधारात
पेटवूया ज्ञानाच्या ज्योती
रोज शाळेला जावूनी
पाटी पेन्सिल घ्या हाती

सांगून गेले गाडगेबाबा
ज्ञान म्हणजे तिसरा डोळा
धन अक्षराचे मोठे
राहू नये कुणी खुळा

ज्ञानाची कास धरता
प्रगतीचे उघडतिल दारे
देश साक्षर करण्यासाठी
आपण झटूया सारे

साक्षरतेची मशाल घेवूनी
अज्ञानाला आता तुडवूया
बीज पेरूनी शिक्षणाचे
साक्षर भारत घडवूया



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## सोंगणी

झाली सोंगणी सोंगणी
पीकं खळ्यात चालली
शिवाराच्या काळजात
हुरहुर रे दाटली

आता लागला उन्हाळा
ओल खोल खोल गेली
काळ्या भुईच्या मनाची
कशी पानगळ झाली

वारं भयान सुटलं
झळा उन्हाच्या तापल्या
चिटपाखरांच्या संगे
फांद्या उन्हात रापल्या

रानं उदासली सारी
भेगा भुईला पडल्या
रणरणत्या रानात
किती सावल्या भाजल्या

येता सण आखाजीचा
शेतकरी रानीवनी
उगड्या नागड्या मातीत
सुरू झाली वखरणी

रान मशागत होता
सारं शिवार हसलं
रानोमाळी शिवारात
रानवारं हुंदडलं

गंध सुटता मातीचा
रान हरखून गेलं
पुन्हा सपन हिरवं
मायमातीला पडलं

**कवी ज्ञानेश्वर गायके**

## वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी पुस्तकांशी मैत्री करा !




**पाटोदा ( प्रतिनिधी)** : पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा ग्रंथालय विभागाच्यावतीने दि. ०१ - ०२ जानेवारी २०२६ रोजी ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात भव्य ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. यावेळी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर,गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, प्रा.डॉ. सुनील जाधव ,प्रा.सोमनाथ घाडगे हे उपस्थित होते तर महाविद्यालयीन समिती सदस्य ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे, प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. बापू घोक्षे, अंतर्गत मूल्यमापन समितीचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.लोखंडे बंडू, प्रा. डॉ.शिवाजी काकडे, कनिष्ट विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे, प्रा. सतीश जरांगे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी ग्रंथप्रदर्शनामागील भूमिका स्पष्ट केली. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या मोहिमेद्वारे महाविद्यालयात एक समृद्ध वाचन संस्कृती रुजवून, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणे आणि त्यांना ज्ञानाधिष्ठित समाजाचे जबाबदार घटक बनवणे, हे या उपक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे असे सांगितले. उद्धाटनाप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले कि, आजच्या डिजिटल आणि वेगवान युगात युवा पिढीचा कल पुस्तकांपेक्षा स्क्रीनकडे अधिक वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्याची प्रत्यक्ष ओळख करून देऊन त्यांच्यात वाचनाची अभिरुची पुन्हा निर्माण करणे तसेच पुस्तके ही केवळ माहितीची साधने नसून ती विद्यार्थ्यांची वैचारिक प्रगल्भता आणि चरित्र घडवणारे सच्चे मित्र आहेत. या ग्रंथ प्रदर्शनात वाचनीय पुस्तके, विविध संदर्भग्रंथ, कथा, कादंबरी ठेवण्यात आले होते. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयातील ग्रंथसंपदा वाचकांना उपलब्ध करून देण्यात आली. सदर वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत ०१ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा राबविण्यात येणार असून या उपक्रमाच्या माध्यमातून प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, सामुहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा यासारखे अनेक उपक्रम या दरम्यान घेण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. प्रा. लोखंडे बंडू यांनी मानले. या ग्रंथप्रदर्शनात सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर वृंद, विद्यार्थी तसेच वाचकांनी आपला सहभाग नोंदवला.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002